|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon




## आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

जा.क्र. कबचौउमवि/१९ /आ.अ.व वि.वि./ व्याख्यानमाला/ ३९/२०२२ **ई.पत्र** दि.२७/०४/२०२२

**प्रति,**
**मा.प्राचार्य/ संचालक/ विभागप्रमुख/समन्वयक**
**कबचौउमविशी संलग्नित असलेली सर्व महाविद्यालये,**
**मान्यता प्राप्त परीसंस्था व विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा- विभाग यांना..**

**विषय :-‘ खान्देशकन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी ’ ऑनलाईन व्याखान मालेत नॅशनल स्पेस सोसायटीचे संचालक मा.श्री. अविनाश शिरोडे यांचे व्याख्यानास ऑनलाईन उपस्थित राहणेबाबत..**

महोदय, महोदया,

आजीवन अध्ययन व विस्तार विभाग कबचौउमविच्या माध्यमातुन विद्यापीठ परीक्षेत्रातील विविध महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने परीसरातील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा, व्यक्तीमत्व विकास व संवाद कौशल्य अशा विविध विषयांवर तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी त्यांच्याशी संबंधित असलेल्या विविध विषयांवर कार्यशाळा व कार्यक्रमांचे आयोजन वेळोवेळी करण्यात येत असते. समाजातील सर्वच घटकांसाठी आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे समाजाच्या सर्वच घटकांवर परिणाम करणाऱ्या विविध विषयांवर प्रत्येक महिन्यात ऑनलाईन पध्दतीने शिक्षण,कला, क्रिडा, साहित्य, स्पर्धा परीक्षा, समाजकारण, राजकारण, सांस्कृतिक, भारतीय प्रशासन सेवेतील विविध अधिकारी, ज्येष्ठ नागरिक, अर्थकारण व महिलांच्या समस्या अशा विविध विषयांवर समाजात विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या मान्यवरांना आमंत्रित केले जाणार असून संबंधित विषयातील तज्ञ व्यक्तींना आमंत्रित करुन ‘ खान्देश कन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी ’ यांच्या नावाने ऑनलाईन पध्दतीने व्याख्यानमाला कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे सुरु करण्यात आली असून याचा लाभ समाजातील विविध घटकांना होणार आहे. या व्याख्यानमालेचे उद्घाटनाचे व्याख्यान यापुर्वी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री गिरीष प्रभुणे यांचे ‘ भारताच्या उभारणीत भटके विमुक्तांचे योगदान’ व ‘ग्रामीण महाराष्ट्रातील प्रतिभा ’ या विषयावर टी.व्ही व सिनेअभिनेत्री सुरभी हांडे हिचे व्याख्यान संपन्न झाले आहे.

सॉफ्टवेअर, सिव्हील, स्ट्रक्चरल व आर्किटेक्चरल अभियंत्याची पदवी मिळवून विविध ठिकाणी संशोधनाचे कार्य करणारे तसेच ॲरोस्पेस अभियंता म्हणून इस्त्रो अंतर्गत येणाऱ्या विक्रम साराभाई स्पेस सेंटर त्रिअनंतपुरम येथे संशोधनाचे कार्य केलेले तसेच आर्किटेक्चरल अभियंता म्हणून शुगर टेक्सटाईल्स आणि इंडस्ट्रीयल प्रोजेक्ट अंतर्गत विश्व बँक अंतर्गत विविध प्रोजेक्टवर जगभर विविध ठिकाणी उत्तम कार्य असलेले सॉफ्टवेअर अभियंता म्हणून विविध सॉफ्टवेअर ज्यांनी डेव्हलप केले तसेच ज्यांनी ईलेक्ट्रीकल आणि मॅकेनिकल या क्षेत्रात ‘Low RPM Low Wind velocity aero-generator’ या विषयावर संशोधन करुन ग्रामिण भागातील जनतेला विज वापरासाठी कशी उपलब्ध होईल याबाबत भारत सरकारला माहिती उपलब्ध करुन दिली. या संशोधनाबद्दल ज्यांना अनेक पुरस्कार व केंद्र शासनाकडून रितसर पेटंटही मिळाले. त्याच बरोबर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध ठिकाणी अनेक उच्च पदावर त्यांनी कार्य केले असून अमेरीकेतील सुप्रसिध्द अशा नॅशनल स्पेस सोसायटीचा संचालक पदी ज्यांची नियूक्ती झालेली आहे.

ईतक्या मोठया संस्थेच्या संचालक पदावर नियुक्त होणारे आपण पहिले भारतीय असुन मुळचे जळगाव जिल्हयातील असलेले अभियंता श्री.अविनाश शिरोडे यांचे ‘ कवयित्री बहिणाबाई चौधरी ’ व्याख्यानमालेत शनिवार दि.३० एप्रिल २०२२ रोजी दुपारी ०४.३० वाजता **‘ कुतूहल अंतराळ विज्ञानाचे ’** या विषयावर ऑनलाईन पध्दतीने व्याख्यान देणार आहेत. अंतराळक्षेत्रातील अमर्याद संधीबद्दलही ते आपल्या व्याख्यानात माहिती देणार आहेत.

सदरचे व्याख्यान झुम-लिंक, यु-टयुब तसेच फेसबुक वरुन समाजातील विविध घटकांना ऐकता येईल व यात व्याख्यान ऐकणाऱ्या श्रोत्यांना व्याख्यात्यांना विषयाशी संबंधित प्रश्न सुध्दा विचारता येतील. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर व्याख्यानाची लिंक उपलब्ध करुन देण्यात येईल. विद्यापीठाचे पदाधिकारी या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन करतील. व्याख्यानमालेस आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना ऑनलाईन पध्दतीने उपस्थित राहण्याविषयी सुचित करावे ही नम्र विनंती.

कळावे!

**आपला विश्वासू,**

**(प्रा.मनिष आर. जोशी)**
**संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग**

**प्रत :-** सिस्टीम अॅनॅलिस्ट, संगणकशास्त्र प्रशाळा, क.ब.चौ.उमवि, जळगाव :- उपरोक्त परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रकट करावे.

**Phone-0257-2257415/416**
**FAX-0257-2258403-406**
**वेबसाईट-nmu.ac.in**
**ई.मेल- directorllleb@nmu.ac.in**

Registrar KBCNMU, Jalgaon is inviting you to a scheduled Zoom meeting.

Topic: खान्देशकन्या बहिणाबाई चौधरी व्याख्यानमाला **विषय :-‘ कुतूहल अंतराळ विज्ञानाचे ’**

Time: Apr 30, 2022 04:30 PM Mumbai, Kolkata, New Delhi

Join Zoom Meeting
https://us06web.zoom.us/j/9199436597?pwd=TE1rSkUycmNDaVBCcURBSmFYMmFWZz09

Meeting ID: 919 943 6597
Passcode: lifelong

हा कार्यक्रम फेसबुकवर लाईव्ह प्रक्षेपित करण्यात येईल.

https://www.facebook.com/profile.php?id=100078043982977